लोंमीगा॥ दुःखझालेंदारुण ॥ यावयायेथवरी॥ होतें हेंचीकारण ॥ दुर्लभभेटीतुझी ॥ पायींझालेंदरुशन॥ विनवितोतुकासंतां॥ दोन्हीकरजोडोन॥६॥ ॥६९८॥

देखतहोतोंआधिमागेंपुढेंसकळ ॥ मगहेदृष्टिगेलीवरी आलेंपडळ ॥ तिमिरकोंदलेंसेंवाटेवाढतप्रबळ॥ भीत मीआलोंदेवाकायझाल्याचेंफळ ॥ १ ॥ आतांमजदृ ष्टिदेईपांडुरंगामायबापा ॥ शरणमीआलोंआतांनि वारोनियांपापा॥ अंजनलेववुनीकरींमारगहासोपा॥ जाइनसिद्धपंथें अवघ्याचुकतिलखेपा ॥ २॥ होतसेखे दचित्ताकांहींनाठवेविचार ॥ जातहोतोंजनामागेंतो हिसांडिलाआधार ॥ हानातोठावझालाअवघापडि लाअंधार ॥ फिरलींमाझींमजकोणींनदेतिआधार ॥ ॥ ३ ॥ जंववरिचळणआतांतंवरिह्मणतीमाझा ॥ मा नितिलाहानथोरदेहसुखाच्याकाजा ॥ इंद्रियेंमावळ लींआलाबागुलआजा ॥ कैसाहोताविपरीतझालातो चिदेहनव्हेदुजा ॥ ४ ॥ गुंतलोयासंसारेंकैसाझालोंत रिआंध॥मीमाझेंवाढवोनिमायातृष्णेचाबांध॥स्वहित नदिसेचिकेलाआपूलावध ॥ लागलेकालपाठीसवें कामहेक्रोध ॥ ५ ॥ लागतीचालतांनागुणदोषाच्याठे सा ॥ सांडिलीवाटमगझालोंनिराळाकैसा ॥ पाहातो वाटतुझीथोरकरोनियांआशा ॥ तुकाह्मणेवैद्यराजापं ढरिच्यानिवासा॥६॥ ॥६९९॥

आंधळापांगुळ.

आंधळ्यापांगळ्याचायेकविठोबादाता ॥ प्रसवलावि
श्वतोचिसर्वहोयजाणता ॥ भवदुःखकोणवारीतुजवां
चुनचिंता ॥ घडीमोडींहेळामात्रेंपापपुण्यसंचिता ॥
॥ १ ॥ धर्मजागोतुझातुंचिरूपाळुवाराजा ॥ जाणसि
जिविचेगानसांगतासहजा ॥ धृ० २ ॥ घातलीलोळणी
गापुंडलिकेंवाळूवंटीं ॥ पंढरिपुण्यठावनीरेभीवरेतटीं ॥
नदेखोदुसरेगाजालीअदृश्यदृष्टी ॥ वोळलाप्रेमदाताके
लीअमृतवृष्टी ॥ ३ ॥ आणिकउपमन्ययेकबाळधाकु
टें ॥ नदेखेनचलवेजनचालतेवाटे ॥ घातलीलोळणी
गाहरिनामबोभाटें ॥ पावलात्यात्याकारणेंगाधावघा
तलीनेटें ॥ ४ ॥ वैसुनियांखिळीशुकराहेगर्भीआंध
ळा ॥ शिणलावेरझारींदुःखआठवीवेळोवेळा ॥ मा
गिलसोसिलेतनाभीझणेगोपाळा ॥ पावलात्याःकार
णेलाजराखिलीकळा ॥ ५ ॥ नदेखेजोयाजनातयादा
वीआपणा ॥ वेगळासुखदुःखमोहानाठवेधना ॥ आ
पपरतेहिनाहींबंधुवर्गसज्जना ॥ तुकयातेचिपरीझाली
पावेनारायणा ॥ ६ ॥ ॥ ७०० ॥

आंधळा.

सहजमीआंधळागानिजनिराकारपंथें ॥ वृत्तिहेनिवृ
त्तिझालीजननदिसेतेथें ॥ मीमाझेंहारपलेंठाईजेथींच्या
तेथें ॥ अदृश्यतेंचीझालेंकांहींदृश्यजेंहोतें ॥ १ ॥ सुखेंमी
निजलोंगाशून्यसारोनितेथें ॥ त्रिकूटशिखरींगादान

मिळे आर्यांते॥धृ०॥२॥टाकिलीपात्रझोळीधर्मअधर्म आशा॥कोल्हाळचुकविलात्रिगुणाचावोळसा॥नमा गेंभीकआतांहाचिझालाभरवसा ॥ वोळलीसत्रावी गातिणेपुरविलीइछा ॥ ३ ॥ ऊर्ध्वमुखेंआळविलासो हंशब्दाचानाद ॥ अरुपजागविलादाताघेउनिछंद ॥ घेउनिआलादाननिजतत्वनिजबोध ॥ स्वरूपींमेळवि लेंनावठेविलेंभेद ॥ ४ ॥ शब्दहाबहुसारउपकाराचिरा शी ॥ ह्मणोनिचालविलामागेंयेतीलत्यांसी ॥ मागो निआलिवाटसिद्धओळीचीतैशी ॥ तरलेतरलेगाआ णिकहिविश्वासी ॥ ५ ॥ वर्मतेंयेकआहेदृढधरावाभा व ॥ जाणिवनागवणलागोनेदीतोठाव ॥ ह्मणउनिसं गटाकींसेवींआहेतभाव ॥ तुकाह्मणेहाचिसंतींमागें केलाउपाव ॥ ६ ॥ ॥ ७०१ ॥

भगवंतातुजकारणेमेलोंजितेचिकैशी ॥ निष्कामबु द्धीठेलीचळणनाहींतयासी ॥ नचलतीहातपायदृष्टि फिरलीकैसी ॥ जाणतांनदेखोंगाक्षरआणिअक्षरासीं ॥ १ ॥ विठोबादानदेगातुझ्यासारिखेनामा ॥ कीर्तिहे वाखाणिलीथोरवाटलीसीमा ॥ धृ० ॥ २ ॥ भुक्तिमुक्तितूं चियेकहोसिसिद्धीचादाता ॥ ह्मणोनिसांडवलीशोकल ज्याभयचिंता ॥ सर्वस्वेंत्यागकेलाधांवघातलीआतां ॥ रुपादानदेईदेवायेउनिसामोराआतां ॥ ३ ॥ संसारु सागरुगाभवदुःखाचेंमूळ ॥ जनवादआंथरुणमाजी केलेविंगळ ॥ इंद्रियेंवज्रघातेंतपेंउष्णवरिज्वाळ ॥ सो

शिलेकायकरूंदुर्धरहेचांडाळ॥ ४॥ तिहींलोकींतुझेंना
मवृक्षपल्लवशाखा ॥ वेंघलोंवरिखोडाभावधरोनिठे
का ॥ जाणवीनरनारीजागोधरमलोका ॥ पावतीपु
ण्यवंतसोईआमुच्याहाका॥५॥ नाठवेआपपरआतां
कायबाकरूं ॥ सारिखादोहीसवाहारपलाविचारू ॥
घातलायोगक्षेमतुजआपुलाभारू ॥ तुकयाशरणाग
तादेईअभयकरू॥६॥ ॥७०२॥
देशवेषनव्हेमाझासहजफिरतआलों ॥ करूंसत्ताकव
णावरिकोठेस्थिरराहिलों ॥ पायडोळेह्मणतांमाझेंति
हिकैसामोकलिलों ॥ परदेशीनाहींकोणीअंधपांगुळ
झालों॥१॥ आतांमाझीकरींचिंतादानदेईभगवंता ॥
पाठींपोटींनाहींकोणीनिरवीसज्जनसंता ॥ धृ० ॥ २॥
चालतांवाटपुढेंभयवाटतेंचित्तीं ॥ बहुतजनगेलेनाहीं
आलेमागुती ॥ नदेखेकायझालेंकायनतरीऐकती ॥
बैसलोंसंदिभागींतुजधरोनिचित्तीं ॥ ३॥ भाकितोंक
रुणागाजैसासांडिलाठाव ॥ नभरेचिपोटकधींनाहीं
निश्चळपाव॥ हिंडतांभागलोंगालक्षचौऱ्याशींगांव॥
धरोनिराहिलोंगाहाचिवसताठाव ॥ ४ ॥ भरवसाका
यआतांकोणआणिअवचीता ॥ तैसीचझालीकीर्ति
तयामजबहुता ॥ ह्मणउनिमारीहाकासोइपावेपुण्यवं
ता ॥ लागलीभूकथोरीतूंचिकृपाळूदाता ॥ ५ ॥ संचि
तसांडवलेंकांहींहोतेंतेंजवळी॥ वित्तगोतपूतमायातुट
लीहेलागावळी ॥ निष्कामझालोंदेवाहोतेंमाझेंकपा

ळीं ॥ तुकाह्मणेतूंचिआतांमाझासर्वस्वेंबळी ॥ ६ ॥
॥ ७०३ ॥

वासुदेव.

मनुराजायेकदेहपुरी ॥ असेनांदतुत्यासिदोघीनारी ॥ पुत्रपौत्रसंपन्नभारी ॥ तेणेंकृपाकेलीआह्मावरीगा ॥ ॥ १ ॥ ह्मणउनिआलोंयादेशा ॥ होतोंनाहींतरभुललों दिशा ॥ दातातोहिमजभेटलाइच्छा ॥ येउनिमारगदा विलासरसागा ॥ २ ॥ सर्वेंघेऊनिचवघेजण ॥ आला कुमरसुलक्षण ॥ कडेचुकउनिकांटवण ॥ ऐकाआणि लीतीकोणकोणगा ॥ ३ ॥ पुढेंभक्तिनेंधरिलेंहातीं ॥ मागेंज्ञानवैराग्यधर्मयेती ॥ स्थिरकेलीजेआचपळहो ती ॥ सिद्धआणोनिलाविलीपंथींगा ॥ ४ ॥ केलेउपका रसांगूंकाय ॥ बापनकरीऐसिमाये ॥ धर्मेंत्याच्यादेखि येलेपाय ॥ दिल्हेअक्षयअभयदानगा ॥ ५ ॥ होतोंपीडत हिंडतांगाव ॥ पोटनभरेनराहावयाठाव ॥ तोयेणेंअव घासंदेह ॥ ह्मणेफेडियलीतुकयाचाबांधवगा ॥ ६ ॥
॥ ७०४ ॥

गातोंवासुदेवमीऐका ॥ चित्तठाईंठेउनिभावयेका ॥ डोळेझांकोनिरात्रकरूंनका ॥ काळकरितबसलासेले खागा ॥ १ ॥ रामरामस्मराअधीं ॥ लाहोकरागांठघा लामुळबंदी ॥ सांडावाउग्याउपाधी ॥ लक्षलाऊनियां राहागोविंदींगा ॥ २ ॥ अल्पआयुष्यमानवदेहे ॥ शत गणिलेंतेंअर्धरात्रखाये ॥ पुढेंबाळत्वपीडारोगक्षय ॥

कायभजनातेंउरलेंतेंपाहेगा ॥ ३ ॥ क्षणभंगुरनाहींभ
रवसा ॥ व्हारेसावधतोडामायाआशा ॥ कांहींनचले
मगगळांपडेलफासा ॥ पुढेंहुशारथोरआहेवोळसागा
॥ ४ ॥ कांहींथोडेबहुतलागपाठ ॥ कराभक्तिभावधरा
बळकट ॥ तनमनध्यानघालाउनियांनीट ॥ जरिकर
णेअसेलगोडशेवटगा ॥ ५ ॥ विनवीतोंसकळजना ॥
करजोडोनिथोरलाहाना ॥ दानइतुलेंचिद्यामजदीना ॥
ह्मणेतुकयाबंधुरामह्मणागा ॥ ६ ॥ ॥ ७०५ ॥
गेलेटळलेपाहारतीन ॥ कायनिदसुराआझुन ॥ जागे
होउनिकांहिंकरादान ॥ नकाऐकूनझांकूनिलोचनगा
॥ १ ॥ हरिरामकृष्णवासुदेवा ॥ जाणवितसेजना ॥ चि
पळ्याटाळहातीं ॥ मुखींघोषनारायणागा ॥ २ ॥ जेठा
केलकोणाकायहीं ॥ फळपुष्पअथवातोय ॥ घ्यापरि
मिसघेउनकाभाई ॥ पुढेंविन्मुखहोताबरेंनाहींगा ॥ ३ ॥
देवाकारणेभावतस्मात् ॥ द्यावेंनलगेफारसेंवित्त ॥ झा
लेंयेकचित्ततरिबहुत ॥ येवढ्यासाठींनकाकरूंवाताहत
गा ॥ ४ ॥ आलोंयेथवरिबहुसायासें ॥ करितांदानहेची
मागावयास ॥ नकाभारघेऊंकरुनिरास ॥ धर्मसारफ
ळसंसारासगा ॥ ५ ॥ आतांमागुतायेईलफेरा ॥ हेंतोंन
घडेयानगरा ॥ ह्मणेतुकयाबंधुभावधरा ॥ वोळखिना
हींतरीजालआघोरागा ॥ ६ ॥ ॥ ७०६ ॥
रामरामदोनिअक्षरें ॥ सुलभआणिसोपींरे ॥ जागामा
गिलपाहारे ॥ सेवटिचेंगोडतेंचिखरेंगा ॥ १ ॥ रामकृष्ण

वासुदेवा ॥ जाणवीतसेजना ॥ वाजविचिपळिया ॥
टाळघागऱ्याघोषगा॥ २॥गायवासुदेववासुदेवा॥भी
न्ननाहिआणिकानावा॥ दानजाणोनियाकरीयावा॥
नठेवीउरीकांहींठेवागा॥ ३ ॥ येकवेळाजाणविती ॥ ध
रोनियांराहाचित्तीं ॥ नेघेभारसांडीकामाहातीं ॥ निज
घेउनियांफिरतीगा॥ ४ ॥ सुपात्रींसर्वभाव ॥ मीतोस
र्ववासुदेव ॥ जाणतीकृपाळुसंतमहानुभाव॥ जयाभि
न्नभेदनाहींठावगा ॥ ५॥ शूरदानजिवेंउदार ॥ नाहीं
वासुदेवींविसर॥ कीर्तिवाढेचराचर ॥ तुकाह्मणेतया
नमस्कारगा॥ ६ ॥ ॥ ७०७॥

बोलबोलेअबोल॥ जागेबाहेरआंतनिजले॥ कैसेघरां
तघरकुलकेलें ॥ नेणेअंधारनाउजडलेंगा॥ १ ॥ वासु
देवकरितोफेरा॥ वाडियांतबाहिरद्वारा॥ कोण्हिकांहीं
तरीदानकरा॥ जावनघालतरिजातोंसामोरागा॥ २॥
हातींटाळदिंडीमुखीगाणें ॥ गजरहोतोबहुमोठ्यानें ॥
नाहिनिवडिलींथोरलाहानें॥नकानीजोभीकेच्याभेणे
गा॥ ३॥ मीवासुदेवतत्वता॥ कळोंयेइलविच्यारिता॥
आहेठाउकासभाग्यसंतां॥नाहिंदुजाआणिकमागतां
गा॥ ४॥ कायजागाचिनिजलासी॥ सुनेजागउनिदा
रापासी ॥ तुझ्याहितापाठिकरिवसवसी ॥ भेटिनघेसि
वासुदेवासिगा ॥ ५॥ ऐसेजागविलेआवघेजन॥ हो
तेंसंचिततेंहिकेलेंदान ॥ तुकाह्मणेदुबळींकोणकोण ॥
गेलीवासुदेवासिविसरुनगा ॥ ६ ॥ ॥ ७०८॥

जगजोगीजगजोगी॥ जागेजागेबोलती ॥ १ ॥ जा
गताजगदेव॥राखाकांहींभाव ॥ २ ॥ अवघाक्षेत्रपा
ळ॥पूजावासकळ॥३॥पूजापत्रकांहीं ॥फळपुष्पतो
यि॥ ४ ॥ बहुतादिसांफेरा॥ आलायानगरा ॥ ५ ॥ न
काघेऊंभार॥ धर्मतोचिसार ॥ ६ ॥ तुकामागेदान॥
द्याजीअनन्य॥ ७॥ ॥७०९॥
ऐकागायेभाई ॥ सर्वदासांगतोकाई ॥ येथेंनाडेलमा
यि॥ दोघांपुत्रांची॥१॥तेकरितीतिचीविटंबणा॥ अव
घ्याप्रसिद्धजना॥ येकनमारिताशाहाणा॥तोजाणासु
खनपवे॥२॥आणिकऐकागाय॥सर्वदासांगतोकाय॥
खरेंबोलेतोजाय ॥ नरकामध्येंअधोगती॥ ३ ॥हेंचौ
घांच्यामुखें ॥ मनाआणावेंसुखें ॥ अवघींचुकतीदुः
खें॥ खोटेंबोलानरनारी ॥ ४ ॥ आणिकनाडेलयेकजा
ण॥ सर्वदाबोलतोवचन॥ जागेमाझेंचित्तह्मणोन ॥
पडिलेखाणतयावरी॥ ५ ॥ ह्मणूननह्मणामाझेंकांहीं॥
निजिनिजासुखेठाई ॥ यत्नहोइलतयि ॥ चोरटाईवि
श्वास ॥ ६ ॥ आणिकयेकिपरी ॥ सरवदासांगतोंथो
री ॥ दुःखपावेलनारी ॥ पतिव्रतायामधीं ॥ ७ ॥ पा
चांनींदिधलीहातीं॥ह्मणोनिनह्मणाविनिश्चिती॥ पर
पुरुषींहोयरती॥सुखगतितेंपावे ॥८॥ आणिकयेकि
परि॥सरवदासांगतोंतेंकरी॥दानदेतांजोनवारी॥ नव्हे
भलाभलातो ॥ ९ ॥तुकाह्मणेअयि॥ येथेंनावकाई॥

सांगसीतठाई ॥ मरोरडिचे ॥ १० ॥ ॥७१०॥

सवालयारोउपरतलेदोनोमारकिचोट ॥ नजरकरेसो हिराखेपश्याजावेलुट ॥ १ ॥ प्यारखुदाईप्यारखुदाईप्या रखुदाई ॥ रेबाबाजीकीरखुदाई ॥ २ ॥ उडेकुदेढुंगनचा वेआंगनभुलनप्यार ॥ लडबडबडबडकरहेकाखचला वतभार ॥ ३ ॥ कहेतुकासुनोयेकाहमजिन्होकेसात ॥ मिलावेसोउसेदेनातोहिचढावेहात ॥ ४ ॥ ॥७११॥

सबसमालम्यानेलौंढेखडाकेउगुंग ॥ मदिरथीमहाकु वाभुलिपाडिभंग ॥ १ ॥ आपसकसुंबालमुंडेखुबराखे ताल ॥ मुथीवोहिबोलनहितोकरुगाहाल ॥ २ ॥ अव लकातोपिछेनहींमुदलविसरजाय ॥ फिरतेनहीलाजरं डीगड्ढेगोतेखाय ॥ ३ ॥ जिन्होखातिरइतनाहोतासो नहितुजेवेकाम ॥ उंचाजोरोलियातुबातुबाबुराकाम ॥ ४ ॥ निकलजावेचिकलजोरामुढेदिलदारी ॥ जवा नीकींछोडदेबातफिरयेकतारी ॥ ५ ॥ कहेतुकाफिसल रुकामेरेकोतोदानदेख ॥ पकडधक्कागांडगुडघिमरच लाउआलेख ॥ ६ ॥ ॥७१२॥

नजरकरेसोजिकेबाबादुरधितमासादेख ॥ लकडिफा सालेकरबैठाआंगलेटकणभेख ॥ १ ॥ काहेभुलायकेदे खतआंखोमारतंडांगोबाजार ॥ दमरीचमरीजोनरभु लासोतआघोहिलतखाय ॥ २ ॥ नहिबुलावतकिसबा बाआपहिमतजाय ॥ कहेतुकाउसआसाकेसंगफिर फिरगोतेखाय ॥ ३ ॥ ॥७१३॥

दरवेस.

अल्लाकरेसोहोयबाबा ॥ करतारकासिरताज ॥ गाउ
बछेरेतिसचलावे ॥ यारिबांधोनसात ॥ १ ॥ ख्यालमे
रासाहेबकाबाबाआपेहुवाकरतार ॥ छाटेआघेचढेपी
टआपेहुवाअसवार ॥ २ ॥ जिकिरकरोअल्लाकीबाबा
सबल्याअंदरभेस ॥ कहेतुकाजोनरबुझेसोइभयादरवे
स ॥ ३ ॥ ॥ ७१४ ॥

वैद्यगोळी.

अल्लादेवेअल्लादिलावे ॥ अल्लादारुअल्लाखिलावे ॥ अ
ल्लाबगरनहीकोय ॥ अल्लाकरेसोहिहोय ॥ १ ॥ मर्दहोय
वोखडाफिरनामर्दकुनहिधीर ॥ आपुलेदिलकुकरना
खुसीतीनदामकीखुमासी ॥ २ ॥ सबरसोकाकियामा
रभजनगोलियेकहिसार ॥ इमानतोसबहिसखाथो
डितोभीलेकरजा ॥ ३ ॥ जिनोपासनीतसोयवोहिब
सकरतिरोवे ॥ सातोपाचोमारलगावेउतारसोपिछे
खावे ॥ ४ ॥ सबाज्वानिनिकलजावेपीछेगधडीमद्दी
खावे ॥ गावटालसोक्यालेवेहगवनिभरिनहिधोवे ॥
॥ ५ ॥ मेरीदारुनिन्हेखायादिदारदरगासोहिपाया ॥
तलेहमुंढीघालजावेबिगारिसोवेक्यालेवे ॥ ६ ॥ बज्या
रकाबुझेभावावोहिपुसताअवेठाव ॥ फुकटबाटुकहेतु
कालेवेसोहिलेवेसखा ॥ ७ ॥ ॥ ७१५ ॥

गोंधळ.

राजससुंदरबाळापाहोंअलियासकळावो ॥ बिबीबिबो

निंठलीमाझीपरब्रह्मव्यल्हाळावो ॥ कोटिरविशशिमा
झीपरब्रह्मव्यल्हाळावो॥ १॥राजसविठाबाईमाझेंध्या
नतुझेंपाईवो ॥ त्यजुनियांचौघांसिलावीआपुलिया
सोईवो॥धृ० ॥ २॥ सकुमारसाजिरेकैसींपाउलेंगो
जिरींवो ॥ कंठींतुळसिमाळाउभीभीवरेच्यातीरींवो ॥
॥ ३ ॥ देतहिरियाज्योतिशंखचक्रमिरवेकरींवो॥ नि
र्गुणनिर्विकारवेदानकळेचिआकारवो ॥ शेषादिश्रम
लेश्रुतिनकळेतुझापारवो॥ ४ ॥ उभारोनिबाहेभक्तादे
तअभयकरवो ॥ येउनिपंढरपुरअवतरलीसारंगधरा
वो॥ ५॥ देखोनिभक्तिभाववोरसलिअमृतधारावो॥
देवोनिप्रेमपान्हातुकयास्वामिनेकिंकरावो॥ ६॥

॥ ७१६॥

सुदिनसुवेळतुझामांडिलागोंधळवो ॥ पंचप्राणदिवटे
दोनीनेत्राचेहिलालवो॥ १ ॥पंढरपुरनिवासेतुझेरंगींना
चतअसेवो ॥ नवसपुरवींमाझामनिचीजाणोनियांइ
छावो॥ २॥ मांडिलादेव्हारातुझात्रिभुवनामाझारीवो॥
चौकसाधियलानाभीकळसठेउनिवरीवो॥ ३ ॥ बैस
लीदैवतापुढेंवैष्णवाचेंगाणेंवो ॥ उद्गारेंगर्जतीकंठींतु
ळसींचींभूषणेंवो॥ ४॥ स्वानंदाचेताटींधूपदीपपंचार
तीवो॥ वोवाळिलीमाताविठाबाईपंचभूतींवो ॥ ५ ॥
तुझेंतुजपावलेंमाझानवसपुरवींआतांवो॥ तुकाह्मणे
राखेंआपुलियाशरणागतावो॥ ६॥ ॥ ७१७॥
सुंदरमुखसाजिरेंकुंडलेंमनोहरगोमटेंवो॥ नागरनाग

खोपाकेशरकस्तुरीमळवटवो ॥ विशाळव्यंकटनेत्रीं
वैज्यर्यतीतळपेकंठींवो ॥ कांसेपितांबराचीचंदनसुगं
धसाजेउटीवो ॥ १ ॥अतिबरवंटाबाळाआलीसुलक्ष
णीगोंधळावो ॥ राजसतेजोराशीमिरवेशिरोमणीव्य
ल्हाळावो ॥ कोटिरविशशिप्रभालोपल्यासकळावो ॥
नकळेब्रह्मादिकांअनुपम्यचीथोरीवो ॥ २ ॥ सावळीस
कुमारगोजिरीभुजाशोभतीचारीवो ॥ सखोलवक्षस्थ
ळसुढाळपदकझळकेवरीवो ॥ कंठींक्षुद्रघंटिकाशब्दक
रितीमधुरीवो ॥ गर्जतिचरणीवांकीअभिनवसंगितनृ
त्यकरीवो ॥ ३ ॥ अष्टांगींमंडितकायवर्णावेंरूपठेवणी
वो ॥ शोधिवशुद्धरसाचिवोतींवलावण्याचीखाणी
वो ॥ सर्वकळासंपन्नमंजुळबोलेहास्यवदनीवो ॥ बहु
रूपेंनटलीआदिशक्तीनारायणीवो ॥ ४ ॥ घटस्थापना
केलीपंढरपुरमहानगरीवो ॥ अस्मानीमंडपदिल्हाति
हींतालावरीवो ॥ आरंभिलागोंधळइनेंचंद्रभागेतीरीं
वो॥ आलीभक्तिकाजारुष्णाबाईयोगेश्वरीवो ॥ ५॥
तेतिसकोटीदेवचामुंडाअष्टकोटिबहिरववो ॥ आरत्या
कुरवंड्याकरितीपुष्पांचावरुषाववो ॥ नारदतुंबरगाय
नब्रह्मानंदेंकरितीगंधर्ववो ॥ वंदींचरणरजतेथेंतुकया
चाबांधववो॥ ६॥ ॥ ७१८॥

ऐकबाईतुजवोकायिसांगतोशकून ॥ निजलियाभुर
होसिजागेह्मणऊन ॥ १ ॥ मान्यमाझेंकेलेंसांगतेये
काबोले॥ नयेतांहेभलेकळोकोण्हालोकासी॥ २॥ सां

गतेगुणजिविचीखुणऐकमाझीमात ॥ बैसयेकाभावें माझेहातींदेवोनीहात ॥ ३ ॥ बरवाघरचारतुजसांपड लाठाव ॥ फळनाहींपोटींयेथेंदिसेखोटाभाव ॥ ४ ॥ आ हेतुझ्याहातींयेकानवसाचेंफळ ॥ भावाकरिसाह्यचहुं अठरांचेंबळ ॥ ५ ॥ करिलागपाठचित्तवित्तनकोपाहुं ॥ अक्षइतोचुडातुजभोगइलनाहो ॥ ६ ॥ कुळिचीहीमु ळीतुजलागलिसेदेवी ॥ पाडिलाविसरनेंदीफळनाहीं ठावी ॥ ७ ॥ तुकाह्मणेनांदसुखेंधरींआठवण ॥ माझ्या येतिलकोणित्यांचाराखबहुमान ॥ ८ ॥ ॥ ७१९ ॥

देवतेसंतदेवतेसंत ॥ निमित्यत्याप्रतिमा ॥ १ ॥ मीतों सांगतसेभावें ॥ आसोठावेंसकळां ॥ २ ॥ निराका रिवोसदिशा ॥ येथेंइछापुरतसे ॥ ३ ॥ तुकाह्मणेरोकडे केणें ॥ सेवितांयेणेपोटधाये ॥ ४ ॥ ॥ ७२० ॥

नकळेवोमावमुनिमागेयेकआतुरी ॥ साठीसंवत्सरज न्मतयाउदरीं ॥ १ ॥ कैसाआकळवोमायेचपळवो ॥ त्रिभूवनव्यापकहरीसकळवो ॥ २ ॥ हनुमंताहातींग र्वहरिलादोहींचा ॥ गरुडाविटंबणारूपासत्यभामेच्या ॥ ३ ॥ द्रौपदीचाभेदपुरविलासमई ॥ ऋषिफळवनींदे टीलावील्याठाई ॥ ४ ॥ अर्जुनाच्यारथींकपिस्तंभींठेवि ला ॥ दोहींपैजातेथेंगर्वहरिहादादुला ॥ ५ ॥ भावभ क्तिसत्वगुणझालादुर्जना ॥ तुकाह्मणेसकळाछंदेंखेळे आपणा ॥ ६ ॥ ॥ ७२१ ॥

उदारारूपाळाअगादेवाच्यादेवा ॥ तुजसवेंपणआमु

षादावा ॥ १ ॥ कैसाजासीसांगआतांमजपासुनी ॥
केलेवाताहातदिल्हेंसंसारापाणी ॥ २ ॥ अवघेआवरो
नितुझेलाविलेपाठीं ॥ आतांत्याविसरसोहंकोहंच्या
गोष्टी ॥ ३ ॥ तुकाह्मणेआतांचरणींघातलीमिठी ॥ प
डिलींतिपडोतुझाआह्मासीमिठी ॥ ४ ॥ ॥ ७२२ ॥
करोनिविनवणीचरणींठेवितोंमाथा ॥ परिसावीविनं
तीमाझीपंढरीनाथा ॥ १ ॥ अखंडितअसावेंऐसेंवाटतें
पायीं ॥ साहोनिसंकोचठावथोडासादेईं ॥ २ ॥ आसो
नसोभावआलोंतुझियाठाया ॥ कृपादृष्टीपाहेंमजवर
पंढरिराया ॥ ३ ॥ तुकाह्मणेआह्मीतुझींवेडींबागडीं ॥ ना
मेंभवपाशहातेंआपुल्यातोडी ॥ ४ ॥ ॥ ७२३ ॥
रामकृष्णगीतीगातां ॥ टाळचिपळीयावाजतां ॥ छंदें
आपुलीयानाचतां ॥ निजघेउनिफिरतांगा ॥ १ ॥ ज
नींवनींहाअवघादेव ॥ वासनेचापुसावाठाव ॥ मज
वोळगावासुदेव ॥ ऐसामनींवसोंद्याभावगा ॥ २ ॥ नि
जदानांचीथोरआवडी ॥ वासुदेवासींलागलीगोडी ॥
मुखींनामउच्चारीघडोघडी ॥ ऐसीकराहेवासुदेवजो
डीगा ॥ ३ ॥ अवघासरोनिसेवटझाला ॥ प्रयत्ननचले
कांहींकिला ॥ जागाहोइसांडोनिझोंपेला ॥ दानदेयीवा
सुदेवालागा ॥ ४ ॥ तुकाह्मणेरेधन्यत्यांचेंजिणे ॥ जीं
हींघातलेवासुदेवादान ॥ त्यानलगेयेणेंजाणें ॥ झालें
वासुदेवींराहाणेंगा ॥ ५ ॥ ॥ ७२४ ॥
झालीहोतीकाया ॥ बहुमलिनदेवराया ॥ १ ॥ तुझ्याउ

जळलींनामें ॥ चित्तप्रक्षाळिलेंप्रेमें ॥ २ ॥ अनुतापें
झालाझाडा ॥ प्रारब्धाचानितोडा ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेई
पाइ ॥ ठेउनिझालोंउतराई ॥ ४ ॥ ॥ ७२५ ॥
आजिआनंदुरेकीपरमानंदुरे ॥ जयाश्रुतिनेतिह्मण
तिगोविंदुरे ॥ १ ॥ विठोबाचीवेडीआह्माआनंदुसदा ॥
गाऊंनाचुंटाळीवाहुंरंजऊंगोविंदा ॥ २ ॥ सदासण
सातआह्मानित्यनित्यदिवाळी ॥ आनंदेंनिर्भरआमु
चाकैवारीबळी ॥ ३ ॥ तुकाह्मणेनाहींजन्ममरणाचा
धाक ॥ संतसनकादिकतेआमुचेकवतुक ॥ ४ ॥ ७२६ ॥
विठ्ठलकीर्तनाचेअंतीं ॥ जैजैहरिजेह्मणति ॥ १ ॥ तेचि
सुकृताचेंफळ ॥ वाचारामनामेंनिर्मळ ॥ २ ॥ बैसोनि
हरिकथेसी ॥ होयसावधचित्तासी ॥ ३ ॥ तुकाह्मणेत्या
चाजन्म ॥ सफळझालाभवश्रम ॥ ४ ॥ ॥ ७२७ ॥
प्राणियायेकबीजमंत्रउच्चारी ॥ प्रतिदिनींरामकृष्णह्म
णेकामुऱ्हारी ॥ १ ॥ हेंचिसाधनरेतुझेसर्वसिद्धीचें ॥ नाम
उच्चारीरेगोपाळाचेंवाचे ॥ २ ॥ उपासपारणेनलगेनल
गेवनसेवणें ॥ नलगेधुम्रपानपंचाग्नींतापणें ॥ ३ ॥ फु
काचेंसुखाचेंकांहींनवेंचेभांडार ॥ कोटियज्ञापरिस ॥
तुकाह्मणेहेंसार ॥ ४ ॥ ॥ ७२८ ॥
नचलवेपंथेवचनसंतापालवी ॥ शरीरविटंबिलेंवाटे
भीकमागावी ॥ १ ॥ नकरीरेतैसेआपआपणा ॥ नित्य
रामनामतुह्मीसकळह्मणा ॥ २ ॥ रामह्मणवितारांडा
पोरेंनिरविशी ॥ पडतियमाहातींजाचवितीचौऱ्याऐ

शी ॥ ३ ॥ मुखींनाहींनामतोहिआत्महत्यारा ॥ तुका
ह्मणेलाजनाहींतयागव्हारा ॥ ४ ॥ ॥ ७२९ ॥
थडियेसिनिघतांपाषाणाच्यासांगडी ॥ बुडतांमध्य
भागींतिथेंकोणघालीउडी ॥ १ ॥ नकरीरेतैसेंआपआ
पणा ॥ पतंगजायवाजीवेंज्योतीरे ॥ २ ॥ सावधपणें
सोमलवाटीभरोनियांप्याला ॥ मरणाअंतींवैद्यबोला
वीतोगहिला ॥ ३ ॥ तुकाह्मणेकरीठाईचाविचार ॥ ज
वनाहींपातलायमाचाकिंकर ॥ ४ ॥ ॥ ७३० ॥

फाग.

शंखकरिसीज्याच्यानावें ॥ त्याचेंतुजनाहींठावें ॥ ऐक
सांगतोंयेकाभावें ॥ सांपडतेंघरिंजिवउनिखावेंरेवि
ठ्ठल ॥ १ ॥ टिळेमाळाकरंडीसोंग ॥ धरोनिचाळविलेंज
ग ॥ पसरीहातनाहींत्याग ॥ दावीदगडपूजीभगरेवि
ठ्ठल ॥ धृ० ॥ २ ॥ राखलाउनीआंगमळी ॥ वाहेठोके
मियेकबळी ॥ वासनेहातींबांधवीनळी ॥ त्यासियेऊ
निगिळिउगळिरेविठ्ठल ॥ ३ ॥ कोणतेराहाडीचेंसुख ॥
वरपायहारतेंमुख ॥ करवीपीडाभोगवीदुःख ॥ पडेन
रकींपरिनपळेचिमूर्खरेविठ्ठल ॥ ४ ॥ शिकलाफाकमा
रितोहाका ॥ रांडापोरेंमेळवीलोका ॥ विटंबीशरीरमा
गेरुका ॥ केलेंतेगेलेंआवघेफुकारेविठ्ठल ॥ ५ ॥ क
ळावेंजनामीयेकबळी ॥ उभाराहोनीमांडीफळी ॥ फो
डुनिगुडघेकोपरचोळी ॥ आपलाघातकरोनिआप

णतळमळीरेविठ्ठल ॥ ६ ॥ फुकटखेळेठकलीवायां ॥ ध
रोनिसोंगबोडक्याडोया ॥ शिवोनयेतीआंतरींमाया ॥
संपादणीवीणविटंबिलीकायारेविठ्ठल ॥ ७ ॥ धुळी
मातीकांहींखेळोचिनका ॥ जवादिचंदनघ्यावाबुका ॥
आपणापरिमळआणिकालोका ॥ मोलाचीमहिमा
फजितिफुकारेविठ्ठल ॥ ८ ॥ बहुदुःखीझालीयाखेळे ॥
अंगींबुद्धीनाहींतबळे ॥ पाठीवरीतोबातोंडकाळें ॥ र
सनाद्रव्यउपस्थाच्यामुळेंरेविठ्ठल ॥ ९ ॥ कायसांगतों
तेंऐकातुका ॥ मोडाखेळकांहींआवंगोचिनका ॥ चला
जेऊंअधीपोटींलागल्याभुका ॥ धाल्यावरीमगबराटा
कमटिकारेविठ्ठल ॥ १० ॥ ॥ ७३२ ॥
आहारेभाइप्रथमनमुतोविनायक ॥ ठेउनिगुरुचरण
मस्तक ॥ वदेलप्रसादिक ॥ वाणीहरिहराचेपवाडे ॥
॥ १ ॥ माझीऐसीब्रीदावळी ॥ दासदास्यत्वेंआगळी ॥ पा
न्हेरीनमार्गमळी ॥ जीवनघ्यारेकापडीहो ॥ २ ॥ जेंशीत
ळाहुनीशीतळ ॥ पातळाहुनिपातळ ॥ प्रेमामृतरसा
ळ ॥ तेंसेवाआहोभाग्याचेनो ॥ ३ ॥ जिंकालतरिजिं
कारेअभिमान ॥ दवडालतरीदवडालज्जाआणिमान ॥
धरालतेधराशंभूचेचरण ॥ दावालपणऐसादावातो
॥ ४ ॥ काळघेऊंनेदीवाव ॥ आलातोराखेघावडाव ॥
शुद्धसत्वींराखोनिभाव ॥ ह्मणामहादेवहरिहरवाणी
गर्जोंद्या ॥ ५ ॥ पराविथानारीमाउलीसमान ॥ परध
नींवाटोनेदीमन ॥ जीवित्वतेंतृणासमान ॥ स्वामिका

जींजाण॥शूरह्मणोतयाआह्मी॥ ६ ॥ शक्तिवेचावी
यापरउपकारा॥ खोटेखोट्याचापसारा॥ सत्यतेंभव
नदीचातारा॥ आळसतोनकरायेथेंआलेहोसांगतों॥
॥ ७ ॥ व्रतकरायेकादशीसोमवार ॥ कथापूजनहरि
जागर ॥ पुण्यतेंअसेगातांनाचतांफार ॥ पुन्हाबोलि
लासंसारनाहींनाहींसत्यत्वें ॥ ८ ॥ संगसंतांचाकरि
तांबरवा॥ उत्तमोत्तमकीर्तिचाठेवा॥ पंथतोसुपंथचा
लावा॥ उगवावासनालिगाड ॥ ९ ॥ तुकाचालविती
कावडी॥ प्रवृत्तिनिवृत्तीचोखडी॥ पुढतपुढतीअधिक
गोडी॥ भरोनिकलशभजनआवडी॥ पांडुरंगींनटत
से॥ १०॥ ॥७३३॥
आहारेभाईहेंहरिनामाचेंसत्र॥ पक्केघातलीसर्वत्र॥ पं
थींअवघेपंथमात्र॥ इच्छाभोजनाचेआतंपुरवावया
॥ १ ॥ यावेंतेणेंघ्यावें॥ नसरेसेंकेलेंसदाशिवें ॥ पात्र
शुद्धपाहिजेबरवें॥ मंगळभावेंसकळहरिह्मणारे॥ २॥
नव्हेहेंकांहींमोकळें ॥ साक्षीचाघांचियावेगळे॥ नेदी
नाचोंमत्ताच्चियाबळें ॥ अणोरणीयाआगळें ॥ मह
दादिमहदासाक्षीत्वेंहरिह्मणारे ॥ ३ ॥ हेहरिनामाची
अंबिली॥ जगापोटभरीकेली ॥ विश्रांतिकल्पतरूची
साउली॥ सकळांवर्णासेवितांभली॥ ह्मणाहरहरमहा
देव॥ ४॥ तुकाहरिदासतराळ॥ अवघेहाकारीसकळ॥
यारेवंदूंशिखराचळ ॥ चैत्रमासपर्वकाळ॥ महादेव
दरुशनें॥ ५॥ ॥७३४॥

आहारेभाईतयावरीमाझीब्रिदावळी॥अश्टयेकलीक्रियाहीन॥ १ ॥ थुंकाथुंकात्याच्यातोंडावरी॥वाणितीथोरीदवडावयाबाहेरी॥२॥बाइलेचादासपित्रांसउदास॥भीकभिकाऱ्यासनयेदारा॥ ३ ॥ विद्याबळेंवादकरोनियांछळी॥आणिकासिफळीमांडोनियां॥ ४ ॥ गावींचियादेवानाहींदंडवत ॥ ब्राह्मणअतीतघडेचिना॥ ५ ॥ सदासर्वकाळकरीतोहीनिंदा॥स्वप्नींहिगोविंदाआठवीना ॥ ६ ॥ सर्वकाळकरीसंताचियानिंदा ॥ स्वप्नींहिगोविंदाआठवीना॥ ७ ॥ खासेमध्येंधनपोटासींबंधन॥नेणेंऐसादानधर्मकांहीं ॥ ८ ॥ तुकाह्मणेनटदाउनियांसोंग ॥ लवोनेदीअंगभक्तिभावें ॥ ९ ॥

॥ ७३५॥

आहारेभाइनमोउदासिनझाले॥देहभावाआळवितीदेवातयांनमो ॥ १ ॥ नमोतीर्थपंथेचालतीतयांसी ॥ येतीबोळवितीतयांनमो ॥ २ ॥ नमोतयासंतवचनींविश्वास॥नमोभावेंदास्यगुरूचेंत्यां॥३॥नमोत्यामातापित्याचेंपाळण ॥नमोत्यावचनसत्यवेद ॥ ४ ॥ नमोतयाजाणेंआणिकाचेंसुखदुःख ॥ राखेतानभूकतयांनमो ॥ ५ ॥ परोपकारीनमोतयापुण्यवंता ॥ नमोत्यादमित्याइंद्रियांसी ॥ ६ ॥ तुकाह्मणेनमोहरिचीयादासा॥तेथेंसर्वइच्छापुरलीसे॥ ७॥ ॥ ७३६॥

आहारेभाईगंगानव्हेजळ ॥ वृक्षनव्हेवडपिंपळ॥ तुळसीरुद्राक्षनव्हेमाळ ॥ श्रेष्ठतनुदेवाचिया ॥ १ ॥ समुद्र

नदीनव्हेपैंगा ॥ ॥ पाषाणह्मणोनयेलिंगा ॥ संतनव्हती जगा ॥ माणसाल्यासारिखे ॥ २ ॥ काठीह्मणोंनयेवेतू ॥ अन्नह्मणोनयेसातू ॥ रामरामहेमातु ॥ नयेह्मणोंशब्द हे ॥ ३ ॥ चंद्रसूर्यनव्हतीतारांगणें ॥ मेरुतोनव्हेपर्वता समान ॥ शेषवासुकीनव्हेसर्पजाण ॥ विखाराच्यासा रिखे ॥ ४ ॥ गरुडनव्हेपाखरूं ॥ ढोरनव्हेनंदिकेस्वरू ॥ झाडनव्हेकल्पतरू ॥ कामधेनुगायनह्मणावी ॥ ५ ॥ कूर्मनव्हेकासव ॥ डुकरनव्हेवराह ॥ ब्रह्मानव्हेजीव ॥ स्त्री नव्हेलक्ष्मी ॥ ६ ॥ गवाक्षनव्हेहाड ॥ पाटावनव्हेकापड ॥ परिसनव्हेदगड ॥ सगुणतेईश्वरींचे ॥ ७ ॥ सोनेनव्हे धातु ॥ मीठनव्हेरेतु ॥ नाहींनाहींचर्मातु ॥ कृष्णाजिन व्याघ्रांबर ॥ ८ ॥ मुक्ताफळनव्हेतिगारा ॥ खड्याऐसा नव्हेहिरा ॥ जीवनव्हेसोयिरा ॥ बोळविजेस्वइच्छेने ॥ ९ ॥ गावनव्हेद्वारावती ॥ रणछोडनव्हेमूर्ती ॥ तीर्थनव्हेगो मती ॥ मोक्षघडेदर्शनें ॥ १० ॥ कृष्णनव्हेभोगी ॥ शंकरनव्हेजोगी ॥ तुकापांडुरंगीं ॥ प्रसादलाधला ॥ ११ ॥

॥ ७३७ ॥

सौरी.

वेसनगेलेंनिःकामझालेनरनव्हेनारी ॥ आपुल्यातुटी पारख्याभेटीसौरियाच्याफेरी ॥ १ ॥ त्याचावेधलागला छंदहरिगोंविंदवेळोवेळा ॥ आपुलेमागेंहासतरागेंसा वलघालीगळां ॥ धृ० ॥ २ ॥ जनवेशाभीततोंडाआमुच्या भांडपणा ॥ करकटींभीमातटींपंढरीचाराणा ॥ ३ ॥ वेग

ल्यायातीपडिलोंखंतीं अवघ्यायेकाभावें ॥ टाकियेली चाडदेहभावजीवेंशिवें ॥ ४ ॥ सकळांमध्यें आगळीबु द्धीकरूंतिचीसेवा ॥ वायेतूवांमुढासवेंभक्तिनाचोंभा वा ॥ ५ ॥ ह्मणेतुकाठाकरुकानाचोनिरलज्जा ॥ बहुझा लेंसुखकामेंचुकलियाकाजा ॥ ६ ॥ ॥ ७३८ ॥

आणिकाउपदेशुनेणेनाचोंआपण ॥ मुंढावायामारगे लीवायाहासेंजन ॥ १ ॥ तैसानव्हेचाळाआवरीमनडो ळा ॥ पुढिलाच्याकळाकवतुकजाणोनी ॥ २ ॥ बाहिरल्या वेशेंआंतजैसेतैसे ॥ झांकलेतोंबरेपोटभरेतेनेंमिसें ॥ ३ ॥ तुकाह्मणेकेलातरीकरीशुद्धभाव ॥ नाहींतरीजासीवा याहानातोसाठाव ॥ ४ ॥ ॥ ७३९ ॥

टाकरुकाचालरंडिकांगेकेलीगोवी ॥ पुसोनियांआले ठावह्मणोनिदेतेशिवी ॥ १ ॥ आतांयेणेछंदेंनाचोंवि नोदें ॥ नाहींयागोविंदेंमाझेंमजशींकेलें ॥ २ ॥ कोरडे तेबोलकांगेवेंचितेसीवाया ॥ वर्तेकरोनिदावीतुझ्यामु ळिंचियाठाया ॥ ३ ॥ याजसाठींढौरम्याधरलाहाता ॥ तुकाह्मणेतुह्मीगांठीसोडायाचीखंती ॥ ४ ॥ ॥ ७४० ॥

मोकळीकुंथेरितीगुंतेनाहींभारदावे ॥ धेडवाडाबैसलि खोडाघेतलीआपुल्याभावें ॥ १ ॥ ऐकाबाईलाजनाहीं आणिकात्यागरतीची ॥ समाधानींउंचस्थानींजाणेसे वापतीची ॥ २ ॥ नबोलतांकरीचिंतानमारितांपळे ॥ दा दलाशेजेनावडेनिजेजगझोंडीचेचाळे ॥ ३ ॥ देखतअं धबहिरकानींबोलबोलतांमुके ॥ तुकाह्मणेपतनसोयरी

ऐसीझालीयेकें ॥ ४ ॥ ॥७४१॥

सातचलाकाजळघालातेलफणीकरा ॥ दिवाणदारी
बैसलेपारिनाचोफेरधरा ॥ १ ॥ यासाहेबाचेंझालेंदेणेंवे
ळोवेळानलगेयेणें ॥ आतांहाटींकाशासाठींहिंडोंपाठीं
दुकाने ॥ २ ॥ अवघ्याजणीमूढाधणीनाचोंयेकेघाई ॥
सरसावलेंसुखकैसाचाळायेकेठायीं ॥ ३ ॥ ह्मणेतुका
वोळंगेयेकातोडचिंतामाया ॥ देउनिउद्धारजाऊंमूळीं
चियाठाया ॥ ४ ॥ ॥ ७४२ ॥

सौरीसुरजालेदूरडौरघेतलाहातीं ॥ मायामोहोसांडव
लेतिहींलोकींझालेसरती ॥ १ ॥ चालविठाबाईअवघी
पाजदेईनधरींगुजकांहीं ॥ वाळवंटींसांपडतां ॥ २ ॥ हिं
डोनिचौऱ्यायसीघरेंआलेतुझ्यादारा ॥ येक्यारुक्यासा
ठीआंचवलेसंसारा ॥ ३ ॥ लाजमेलीशंकागेलीनाचों
महाद्वारीं ॥ भ्रांतिसावलेफिटोनिगेलेआतांकैचीउरी
॥ ४ ॥ झालेभांडीजगासांडींनाहींभीडचाड ॥ घालिन
चरणींमिठीपुरविनजीवीचेंतेंकोड ॥ ५ ॥ तुकाह्मणेरु
काकरीसंसारतुटी ॥ आतांतुह्माआह्माकैशीझालीजी
वासाठीं ॥ ६ ॥ ॥ ७४३ ॥

समसपाटवेसनपाठनिःसंगझालेसौरी ॥ कुडपियेला
देशआतांयेउनेदीसुसरी ॥ १ ॥ गाऊंरघुरामाहेचिऊर
लेंआह्मा ॥ नाहींजीवतमावित्तगोतासहित ॥ २ ॥ घट
झालारिताझाकोनिकायआतां ॥ कोणासवेलाजकोे
णदुजेपाहातां ॥ ३ ॥ सौरियाचासंगआह्मादुन्हावलेंज

ग ॥ भिन्नझालें सुखभावपालटलारंग ॥ ४ ॥ लाजभय
झणीनाहींत्यजियेलींदोन्हीं॥ फिरविलावेसनक्केकोण्हा
चिचकोण्ही ॥ ५ ॥ तुकाह्मणेहाआह्मांवेशदिल्हाजेणें॥
जनाप्रतितसवेंअसोयेकपणे ॥ ६ ॥ ॥ ७४४ ॥
नक्केनरनारीसंसारिंआंतरले ॥ निर्लज्जनिःशंकामज
नावेगळेचिठेले ॥ १ ॥ चालरघुरामानेआपुल्यागावा ॥
तुजविणआह्माकोणसोयरासांगाती ॥ २ ॥ जनवाद
लोकनिंद्यपिसुनाचेचेरे ॥ साहूंतुजसाठींअंतरलींसहो
दरें ॥ ३ ॥ बहुतांपाठींनिरोपहाटीपाठविलातुज ॥ तुका
ह्मणेआतांसोडुनिलोकलाज ॥ ४ ॥ ॥ ७४५ ॥

वाघ्या.

अनंतजुगाचादेव्हारा॥निजबोधाचाघुमारा॥ अवचि
तभरलावारा॥ यामल्हारीदेवाचा ॥ १ ॥ शुद्धसत्वाचा
कवडामोठा॥ बोधबिरडेबांधलागाठा॥ गळावैराग्या
चापट्टा ॥ वाटादाऊंयाभक्तीच्या ॥ २ ॥ हृदयकोटंबा
सांगातें ॥ घोळवाजवीअनुहातें ॥ ज्ञानभंडाराचेंपो
तें ॥ रितेंनव्हेकल्पांतीं ॥ ३ ॥ लक्षचोऱ्यायशीघरेंच्या
री ॥ याजन्माचीकेलीवारी ॥ प्रसन्नझालादेवमल्हा
री ॥ सोहंभावींराहिलों ॥ ४ ॥ यादेवाचेभरतांवारें॥
अंगींप्रेमाचेंफेंपरें ॥ गुरुगुरकरीहोवेडेचारे ॥ पाहातु
काभुंकविला॥ ५॥ ॥ ७४६॥
आजिदिवसझाला॥ धन्यसोनियाचाभला॥ १ ॥ झा
लेसंताचेपंगती॥ बरवेभोजननिगुती॥ २॥ रामकृष्ण

नामें ॥ बरविं मोहियेलीं प्रेमें ॥ ३ ॥ तुकाह्मणे आला ॥ च
विरसाळ हा काला ॥ ४ ॥ ॥ ७४७ ॥
तुह्मी नरिवो सांगा कांहीं ॥ आह्मा विशीं रखुमाबाई ॥ १ ॥
शेष उरलें तें ठायीं ॥ वेगिं पाठऊनी देई ॥ २ ॥ टोकत बैस
लों देखा ॥ इछित सें ग्रासा येका ॥ ३ ॥ प्रेम देउनि बहुडा
झाला ॥ तुकाह्मणे विठ्ठल बोला ॥ ४ ॥ ॥ ७४८ ॥
वाट पाहे बाहे निढळीं ठेऊनियां हात ॥ पंढरीचे वाटे दृष्टि
लागलें से चित्त ॥ १ ॥ कइ येतां देखे माझा मायबाप ॥
घटिका बोटें दिवस लेखि धरोनियां माप ॥ २ ॥ डावा डो
ळा लवे उजवी स्फुरत बाहो ॥ मन उतावीळ भाव सांडो
नियां देहो ॥ ३ ॥ सुखसेजे गोड चित्तिं न लगे आणिक ॥
नाठवे घरदार तान पळाली भूक ॥ ४ ॥ तुकाह्मणे धन्य
दिवस ऐसा तो कोण ॥ पंढरीचे वाटे मूळ येतां देखेन ॥ ५ ॥
॥ ७४९ ॥
तुझें दास्य करूं आणिकां मागों खावया ॥ धीग झालें जी
णें माझें पंढरिराया ॥ १ ॥ काय गा विठोबा तुज आतां ह्म
णावें ॥ शुभाशुभ गोड तुह्मा थोराच्या दैवें ॥ २ ॥ संसारा
चा धाक निरंतर आह्मासी ॥ मरणें भलें परि काय अवक
ळा ऐसी ॥ ३ ॥ तुझें शरणागत शरण जाऊं आणिका
सी ॥ तुकाह्मणे कवणा लाज हे कानेणसी ॥ ४ ॥
॥ ७५० ॥
पुरवीली आळी ॥ जे जे केली ते ते काळीं ॥ १ ॥ मायतरी

ऐसीसांगा॥कृपाळुवापांडुरंगा॥ २॥ घेतलेंनुतरी॥उच
लोनीकडियेवरी॥ ३ ॥तुकाह्मणेघास॥मुखींघालीब्र
ह्मरस॥ ४॥ ॥ ७५१॥

पतितपतीत॥मीतोत्रीवाचाप० ॥ १॥ परितुंआपुली
यासत्ता॥मजकरावेंसरता ॥ २ ॥ नाहिचित्तशुद्धि ॥
स्थिरपायापासींबुद्धी॥ ३॥ अपराधाचाकेलों॥ तुका
ह्मणेकितीबोलों॥ ४॥ ॥ ७५२॥

कथेचीसामोग्री॥देहअवसानावरी॥ १ ॥ नकोजाऊंदे
ऊंभंगा॥ गात्रेंमाझींपांडुरंगा॥ २॥ आयुष्यकरीउणें॥
परिमजआवडोकीर्तन ॥ ३ ॥ तुकाह्मणेहाणी ॥ यावे
गळीमनानाणी॥ ४॥ ॥ ७५३ ॥

गळितझालीकाया॥ हेंचिललितपंढरिराया॥ १॥ आ
लेअवसानापाशीं ॥ रूपराहिलेंमानसीं ॥ २ ॥ पाहि
लाकळस॥ चरणिस्थिरावलारस॥३॥ तुकाह्मणेगोड
झालें॥ नारायणींपोटधालें॥ ४॥ ॥ ७५४॥

रत्नजडितसिंहासन॥ त्यावरिबैसलेआपण ॥ १ ॥ कुं
चेढळतीदोहींबाहीं॥ जवळिराईरखुमाबाई॥ २॥ ना
नाउपचारी॥ सिद्धीवोळंगतीद्वारीं ॥ ३॥ हातींघेऊनी
पादुका॥ उभावंदीजनतुका॥ ४॥ ॥ ७५५॥

हिराशोभलाकोंदणीं ॥ जडितमाणीकाचीखाणी ॥
॥ १ ॥ तैसादिसेनारायण॥ मुखसूखाचेंमंडण॥ २ ॥
कोटीचंद्रलीला ॥ पूर्णिमेच्यापूर्णकळा ॥ ३ ॥ तुकाह्म
णेदृष्टिधाये॥ परतोनीमागेंनये॥ ४॥ ॥७५६॥

उभारिलाहात॥ जगींजाणविलीमात ॥ १ ॥ देवबैस
लेसिंहासनीं॥ आलियाचकांचीधणी॥ २॥ येकाचेकै
वाडें॥ उगवेबहुताचेंकोडें ॥ ३ ॥ दोहींठाईंतुका॥ ना
हींपडोंदेतचुका॥ ४॥ ॥७५७॥
जीवेंसांडीयेलाभाव॥ त्याचिनावबळकट॥ १ ॥ पैल
तीराजातांकांहीं॥ संदेहनाहींभवनदी ॥ २॥ विश्वासा
चीधन्यजाती॥ येथेंवस्तीदेवाची ॥ ३ ॥ तुकाह्मणेभो
ळियाचा॥ देवसाचाअंकित॥ ४॥ ॥७५८॥
आशिर्वादतयाजाती॥ आवडिचित्तींदेवाची ॥ १ ॥
कल्याणतेंअसेक्षेम॥ वाढेप्रेमआगळें॥ २॥ भक्तिभा
ग्यगांठीधन॥ त्यानमनजीवासी॥ ३ ॥ तुकाह्मणेहरि
दास॥ तेथेंआससकळ॥ ४॥ ॥७५९॥
तयासाठींवेचूवाणी॥ ऐकोंकानींबारता ॥ १ ॥ क्षमा
माझेहरिजन॥ समाधानपुसतात्या॥ २ ॥ परत्रींचेजे
सांगाती ॥ त्याचियातीनविचारिती ॥ ३ ॥ तुकाह्मणे
धैर्यवंतें॥ निर्मळचित्तेंतींयेक॥ ४॥ ॥७६०॥
अभयउत्तरसंतींकेलेंदान ॥ झालेंसमाधानचित्ततेणें
॥ १ ॥ आतांप्रेमरसेंनघडेखंडण ॥ द्यावेंकृपादानना
रायणा॥ २ ॥ आलेंजेंउचितदेहविभागाशीं॥ तेणेंपा
यापाशींउभींअसों॥ ३॥ तुकाह्मणेकरीपूजनवैखरी॥
बोबड्याउत्तरींगातोंगीत॥ ४॥ ॥७६१॥
असोमंत्रहीनक्रिया ॥ नकाचर्याविचारूं ॥ १ ॥ सेवे

याठाव॥ येथेंभावराहिला॥ ३॥ आतांतुकयापासिहे
वा॥ नाहींदेवातातडी॥ ४॥ ॥७६२॥
ऐकेवचनकमळापति॥ मजरंकाचीविनंती ॥ १ ॥ क
रजोडितोंकथाकाळीं॥ आपणअसावेंजवळी ॥ २ ॥
घेईऐशीभाक॥ मागेनजरीकांहींयेक ॥ ३ ॥ तुकया
बंधुह्मणेदेवा॥ शब्दइतुकाचीराखावा॥ ४ ॥७६३॥
आलिललिताचीवेळ॥ असासावधसकळ॥ १ ॥ ला
होकरावेगींस्मरा॥ टाळिवाहोनिविश्वंभरा ॥ २ ॥ झा
लियाअवसान ॥ नसांपडतीचरण ॥ ३ ॥ तुकयाबंधु
ह्मणेथोडे॥ अवधिउरलीआहेपुढें॥ ४ ॥ ॥७६४॥
नेणोगावूंकांहींधडबोलतांवचन ॥ कायावाचामनस
हितआलोंशरण ॥ १ ॥ करिअंगिकारनकोमोकलूंदु
री॥ पतितपावनब्रिदेंकरावींखरीं ॥ २ ॥ नेणेभक्तिभा
वतुझाह्मणवीतोंदास ॥ जरीदेसीअंतरतरिलज्जाको
णास॥ ३ ॥ ह्मणेतुकयाबंधुतुझेधरियेलेपाय॥ आतां
कोणदुजाऐसाआह्मासीआहे॥ ४॥ ॥७६५॥
तूंचिमायबापबंधुसखाआमूचा॥ वित्तगोतजिवलग
जीवाचा॥ १॥ आणिकप्रमाणनाहींदुसरेंआतां॥ यो
गक्षेमभारतुझेघातलामाथा॥ २॥ तूंचिक्रियाकर्मध
र्मदेवतूंकूळ॥ तूंचितपतीर्थव्रतगुरुसकळ ॥ ३ ॥ ह्मणे
तुकयाबंधुकरिताकरवितादेवा ॥ भावभक्तिपूजापुर
स्कारअवघा॥ ४॥ ॥७६६॥
करोनिउचित ॥ प्रेमघालीहृदयांत ॥ १ ॥ आलोंदान

मागायास॥ थोरकरोनीसायास॥२॥ चिंतनसमयीं॥
सेवाआपुलीचदेई॥ ३॥ तुकयाबंधुह्मणेभावा॥ मज
नीरवावेंदेवा॥ ४॥ ॥७६७॥
गाऊंवाहूंटाळीरंगिंनाचोंउदास॥ सांडोनिभयलज्या
शंकाआसनिरास॥ १॥ बळियाचाबळीतोकैवारीअ
मुचा॥ भुक्तिमुक्तिदातासकळहिसिद्धीचा॥ २॥ मारूं
शब्दशस्त्रबाणनिःशंकअनिवार॥ कंटकाचाचूरशिर
फोडूंकाळाचें॥ ३॥ ह्मणेतुकयाबंधुनाहींजिवाची
चाड॥ आपुलियातेथेंकायआणिकाचीभीड॥ ४॥
॥७६८॥
सांडोनिवैकुंठ॥उभाविटेवरीनीट॥ १॥ आलाआला
रेजगजेठी॥ भक्तापुंडलिकाचेभेटी॥ २॥ पैलचंद्रभा
गेतीरीं॥ कटधरोनियांकरी॥ ३॥ तुकयाबंधुह्मणेअंब
र॥ गजरहोतोजयजयकार॥ ४॥ ॥७६९॥
कृपाळूभक्तांचा॥ ऐसापतिगोपिकांचा॥ १॥ उभान
पाचारितांदारीं॥ नसांगतांकामेंकरी॥ २॥ भावदेखो
निनिर्मळ॥ रजावोढवीकपाळ॥ ३॥ तुकयाबंधुह्मणे
नभजा॥ करिऐसाभोळाराजा॥ ४॥ ॥७७०॥
केलाअंगीकारपंढरीच्यादेवें॥ आतांकायकरितिलका
ळमश्यकमानवें॥ १॥ घातलींबाहिरतींभयहोतेंज्या
ने॥ बैसलाआपणतेथेंघालोनियांठाणे॥ २॥ लागोने
दीवाराढुजियाचाअंगासी॥ हापुरतानिर्द्धारकळोंआ
लाआह्मासी॥३॥ ह्मणेतुकयाबंधुनलगेकरावीचिंता॥

कोणेविशीं आतांबैसलोंहस्तिवरीमाथा ॥ ४ ॥ ७७१ ॥
अगोचरीबोलिलोंआज्ञेवीण आगळें ॥ परितें आतांन
संडावेंकृपाळुराउळें ॥ १ ॥ जाइलरोकडाबोलनपुस
सीआज्ञा ॥ तुझातुझेह्मणविलेपाहापुरुषोत्तमा ॥ २ ॥
नव्हावानवजावानकळता अन्याय ॥ नधरावेतेमनीं
भलताकरीउपाय ॥ ३ ॥ ह्मणेतुकयाबंधुहीनमीह्मणो
नलाजसी ॥ वारालागोपाहातोहेउंच्याझाडासी ॥ ४ ॥
॥ ७७२ ॥
झालीपाकसिद्धीवाटपाहेरखुमायी ॥ उदकतापलेंडेरा
चिकसामर्दूंद्यापायीं ॥ १ ॥ उठापांडुरंगाउशीरझाला
भोजनीं ॥ उभ्याआंचवणागोपिकाकळसघेउनी ॥ २ ॥
अवघ्यासावचितसेवेलागींसकळा ॥ उद्धवअक्रुर
आलेपाचारूंमूळा ॥ ३ ॥ सावरिलीशेजसुमनयातीसु
गंधा ॥ रत्नदीपताटींवाळाविडियाविनोदा ॥ ४ ॥ तुका
विनंतिकरीपाहेपंढरीराणा ॥ असासावचितसांगेसक
ळजना ॥ ५ ॥ ॥ ७७३ ॥
उठासंतजनउठिलेनारायण ॥ आनंदलेमुनिजनतिन्ही
लोक ॥ १ ॥ कराजयजयकारवाद्यांचागजर ॥ मृदंग
अपारटाळघोळ ॥ २ ॥ जोडोनियांकरमुखपाहासाद
र ॥ पायांवरिशीरठेउनीयां ॥ ३ ॥ तुकाह्मणेकायेपढियं
तेमागा ॥ आपुलालेंसांगासुखदुःख ॥ ४ ॥ ॥ ७७४ ॥
घडियाघालोनितळींचालतीवनमाळी ॥ उमटतीको
मळिकुंकूमाची ॥ १ ॥ वंदाचरणरज अवघेसकळजन ॥

तारियेलेपाषाणउदकींजेणे ॥ २ ॥ पैसधरोनिचलाठा
कतठाइंठाईं ॥ मौनधरोनिकांहींनबोलावें ॥ ३ ॥ तुका
आवसरुजाणवितोपुढें ॥ उघडिलेमहालमंदिरेंकवा
डें ॥ ४ ॥ ॥ ७७५ ॥
भीतरिलगेलेहरीराहाक्षणभरी ॥ होईलफळधीरकरा
वा ॥ १ ॥ नकरित्वराऐकेमात ॥ क्षणयेकनिवांतबैसा
वें ॥ २ ॥ करोनियांमर्दनसारिलेंपाणी ॥ झालेदेवअंग
पुशीभवानी ॥ ३ ॥ नेसलासोनसळाविनवीरखुमाई ॥
वाढिलेआतांठाईंचलावेजी ॥ ४ ॥ करोनियांभोजन
घातलेंआंचवण ॥ आनंदेंनारायणपहुडले ॥ ५ ॥ तु
कामातजाणवीआतां ॥ सकळांबहुतांहोतीचिंत्ती ॥ ६
॥ ७७६ ॥
घ्याजिआह्माकांहींसांगाजीरखुमाई ॥ शेषउरलेंतेठायीं
सनकादिकां ॥ १ ॥ टोकतबाहेरिबैसलोंआशा ॥ पुरा
याग्रासायेकमेका ॥ २ ॥ येथवरिआलोंतुझियानावें ॥
आसकरोनिआह्मीदातारा ॥ ३ ॥ प्रेमदेउनियांबहुडा
झाला ॥ तुकाह्मणेआतांविठ्ठलबोला ॥ ४ ॥ ॥ ७७७ ॥
बहुडविलेजनमनझालेंनिश्चळ ॥ चुकउनिकोल्हाळ
आलातुका ॥ १ ॥ पर्यंकींनिद्राकरावेंशयन ॥ रखुमा
ईआपणासमवेत ॥ २ ॥ घेउनियांहातींआलोंटाळवी
णा ॥ सेवेसीचरणास्वामीचीया ॥ ३ ॥ तुकाह्मणेआ
